भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.८ ■ शुक्रवार ९ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


घरचा स्वाद, घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द तूप
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
फोन नं.(०२५६२) २३८६६१ navalgheedhule@gmail.com सर्वत्र उपलब्ध

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी राहुल गांधींसह सर्वच आघाड्यांचे खासदार आक्रमक



**नवी दिल्ली, दि.८ : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीमध्ये इंडिया आघाडीच्या खासदारांचे आंदोलन सलग तिसऱ्या दिवशीही सुरू आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीचे सुमारे तीनशे खासदार गुरुवारी महात्मा गांधी यांच्या राजघाट स्मारकाकडे आंदोलनासाठी रवाना झाले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी ठिकठिकाणी कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या मदतीने ज्ञानेश कुमार यांनी देशातील लोकशाही संपवण्याचे काम केल्याचा आरोप त्यांनी केला.**

मत चोरीच्या माध्यमातून लोकशाहीला धोका निर्माण झाल्याचा दावा करत ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीच्या खासदारांनी केली आहे. दोन दिवसांपासून दिल्लीमध्ये इंडिया आघाडीच्या खासदारांकडून आंदोलन करण्यात येत आहे. मंगळवारी राहुल गांधी यांच्यासह अनेक खासदार केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या दिशेने निघाले होते. मात्र, पोलिसांनी त्यांना अडवल्यानंतर राहुल गांधी यांनी आकाशवाणी भवन येथे ठिय्या आंदोलन केले. तब्बल आठ तासांनंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. बुधवारी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी इंडिया आघाडीच्या खासदारांना स्नेहभोजनासाठी आमंत्रित केले होते. त्यानंतर खासदार जंतर-मंतरच्या दिशेने निघाले. मात्र पोलिसांनी त्यांना मार्गातच अडवत राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह अनेक खासदारांना ताब्यात घेतले.

**गांधींच्या राजघाटावर आंदोलन**

सलग दोन दिवस पोलिसांकडून कारवाई झाल्यानंतर गुरुवारी इंडिया आघाडीचे खासदार पुन्हा एकवटले. राजघाट येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात येणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. दोन दिवसांपासून सरकार आपल्याला आंदोलन करू देत नसल्याचा आरोपही (पान ४ वर)

## बंगळुरात सीजेपीचे आंदोलन मोदींवर टीका

बंगळुरू, दि. ८ : एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पक्षाने बंगळुरूमधील फ्रीडम पार्क येथे विराट आंदोलन केले. सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके, युट्युबर ध्रुव राठी आणि अभिनेते प्रकाश राज यांनी आंदोलनात सहभाग घेतला. आंदोलन दरम्यान नरेंद्र मोदी, मतचोर आणि एसआयआर रद्द करा, अशा घोषणांनी फ्रीडम पार्क परिसर दणाणून गेला.

सीजेपीचे अभिजीत दीपके यांनी भाषणाची सुरुवात आंदोलकांकडून घोषणाबाजी करवून केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मते चोरून निवडणूक जिंकल्याचा आरोप त्यांनी केला. जिवंत मतदारांना मृत घोषित करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी ही लोकशाहीची हत्या असल्याचे (पान ४ वर)

### नटसम्राट गेला घराच्या शोधात...!

## अकाली एक्झिटमुळे सर्वांच्या मनाला तीव्र चटका नाना पाटेकरांच्या मृत्यूने, सर्वच क्षेत्रातून हळहळ



**मुंबई/पुणे, दि.८ : वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी अभिनेते नाना पाटेकर यांचे आज निधन झाले. गोव्यातील रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच या अभिनेत्याने अखेरचा श्वास घेतला होता. डॉक्टरांनी अथक प्रयत्न करूनही नानांना वाचवण्याचे त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टी, रंगभूमीवरील त्यांचे योगदान, तसेच त्यांच्या नाम फाऊन्डेशनमार्फत शेतकऱ्यांसाठी केलेल्या उपक्रमांमुळे महाराष्ट्र सरकारने त्यांच्यावर शासकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला. पुण्यातील डोणजे येथील त्यांच्या फार्महाऊसच्या जागेवर झालेल्या अंत्यसंस्काराच्यावेळी चित्रपट, नाट्य, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. शोककुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अग्नीसंस्कार झाले तेव्हा अनेकांना अश्रू अनावरण झाले. नटसम्राट गेला घराच्या शोधात..., अशीच उपस्थितांची भावना होती. अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही चित्रपटसृष्टीची मोठी हानी असल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला.**

गोवा येथील डोनापावला येथील निवासस्थानी असताना बुधवारी रात्री अभिनेता नाना पाटेकर यांना अस्वस्थ वाटू लागले. पहाटे साडेचारच्या सुमारास त्यांच्या छातीत डाव्या बाजूस दुखत होते. त्यावेळी त्यांनी मित्राला तसा मेसेज पाठविल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर त्यांना देखील रूग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न झाला. डॉक्टरांनी सुमारे पस्तीस मिनिटे त्यांच्यावर उपचार करण्याचा प्रयत्न केला. पण, डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश आले नाही. अखेर पहाटे साडेपाचच्या सुमारास नाना पाटेकर यांना मृत घोषित करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी अभिनेते नाना पाटेकर यांचे मराठी नाटक तसेच मराठी (पान ४ वर)

## काँग्रेस पक्षाच्या ठिय्या आंदोलनाची तातडीने दखल जिल्हा शासकीय रुग्णालयातील सीटी स्कॅन सेवा सुरू




**धुळे, दि.८- जिल्हा शासकीय रुग्णालय, धुळे येथील मागील काही महिन्यांपासून बंद असलेली सीटी स्कॅन मशीन/सेवा तातडीने सुरू करण्यात आल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. सीटी स्कॅन मशीन सुरू करण्यासाठी काँग्रेसच्यावतीने वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.**

जिल्हा शासकीय रुग्णालयातील सीटी स्कॅन सेवा बंद असल्यामुळे सर्वसामान्य, गरीब व गरजू रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. गंभीर आजार, अपघात, डोक्याला झालेली दुखापत, अंतर्गत रक्तस्राव तसेच इतर तातडीच्या वैद्यकीय परिस्थितीत सीटी स्कॅन आवश्यक असल्याने रुग्णांना बाहेरील खासगी केंद्रांमध्ये तपासणी करावी लागत होती. त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत होता. या गंभीर समस्येबाबत (पान ४ वर)

## शहाद्यात आज किसान दिन पुरुषोत्तम पुरस्कार सोहळा

शहादा,दि.०८(का.प्र.)- पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ व श्री. पी. के. अण्णा पाटील फाउंडेशन, शहादा जिल्हा नंदुरबार यांच्या वतीने परिसराचे भाग्यविधाते स्वर्गीय अण्णासाहेब पी. के. पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज शुक्रवार दि.९ऑक्टोबर रोजी सकाळी ९:३० वाजता विचारमंथन, किसान दिन व पुरुषोत्तम पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल सभागृह, लोणखेडा कॉलेज येथे संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन गुजरातचे क्रीडा, युवक कल्याण, उद्योग आणि सांस्कृतिक पर्यटन राज्यमंत्री (पान ४ वर)

## दोंडाईचात जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील सहकारी बँकांची संयुक्त सभा उत्साहात संपन्न




**दोंडाईचा, दि.८- दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई आणि दि हस्ती को-ऑप. बँक लि., दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने खानदेशातील जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सहकारी बँकांची संयुक्त सभा दि. ४ ऑक्टोबर रोजी हस्ती भवन, कोठारी पार्क दोंडाईचा येथे उत्साहात संपन्न झाली.**

खानदेशातील सहकारी बँकांच्या समस्या, बदलते तंत्रज्ञान, डिजिटल बँकिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, सुशासन आणि भविष्यातील बँकिंगच्या संधी यावर यावेळी सविस्तर मंथन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.संजय भेंडे, अध्यक्ष दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई, डॉ. विनायक तराळे, तज्ञ संचालक दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि. मुंबई, जळगाव जिल्हा सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष तथा चोपडा पीपल्स बँकेचे चेअरमन चंद्रहास गुजराथी, दि हस्ती को-ऑप. बँक लि.चे चेअरमन तथा महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे संचालक कैलास जैन, हस्ती बँकेचे व्हा. चेअरमन संजय दुग्गड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार संजय भेंडे यांनी अध्यक्षीय भाषणातून सहकारी बँकिंग क्षेत्राच्या वाटचालीवर मार्गदर्शन केले. बदलत्या काळानुसार सहकारी बँकांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ग्राहक केंद्रित आणि सक्षम बँकिंग सेवा देण्यावर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे तज्ज्ञ संचालक डॉ. विनायक तराळे यांनी सहकारी बँकिंग प्रणाली, सुशासन, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि बदलत्या नियामक व्यवस्थेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक बँकिंगमध्ये प्रभावी प्रशासन आणि सक्षम व्यवस्थापनाची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना दि हस्ती को-ऑप. बँक लि.चे चेअरमन तथा महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे संचालक कैलास जैन यांनी खानदेशातील सहकारी बँकांनी एकमेकांशी नियमित संवाद साधण्याची गरज व्यक्त केली. जळगाव, धुळे व नंदुरबार या विभागातील सहकारी बँकांनी आपल्या समस्या, अनुभव व कार्यपद्धती यांची परस्पर देवाणघेवाण करून सामूहिक चर्चेतून त्यावर मार्ग काढला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. यावेळी जळगाव जिल्हा सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रहास पाटील, प्रविण वानखेडे, भारती विद्यापीठ, पुणे चे संचालक डॉ. अजित मोरे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. (पान ४ वर)



## गुंडगिरी व महिलांच्या संरक्षणासाठी उपाय करा- संविधान संरक्षण समितीची मागणी

**धुळे, दि.८- जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीला आणि गुंडगिरीला कायमचा आळा घालावा, तसेच महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी ठोस आणि प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संविधान संरक्षण समितीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. संविधान संरक्षण समितीचे जेष्ठ निमंत्रित सदस्य श्री. हरिश्चंद्र लोंढे यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीजिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन नुकतेच सादर केले.** (पान ४ वर)

## दोन दुचाकींमध्ये धडक एक ठार, दोन जखमी



धुळे, दि.८- नागपूर -सुरत महामार्गावरील लोंढे नाल्याजवळ (ता. धुळे) दोन मोटरसायकलची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात आरोग्य कर्मचारी ठार झाला. तर अन्य दोन जण जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल केली असून उपचार सुरू आहेत. अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको केल्याने वाहतूक ठप्प झाली.

प्राथमिक आरोग्य केंद्र दहीवेल अंतर्गत छडवेल पखरुण येथील समुदाय अधिकारी छोटू खेका पावरा (३५, रा. रुपाई नगर, साक्री) (पान ४ वर)

### स्मार्ट मीटरच्या विरोधात

## वंचित बहुजन युवा आघाडी आक्रमक वीस दिवसांत कार्यवाही करा- मागणी



**नवापूर, दि.८ (प्रतिनिधी) नवापूर शहर व तालुक्यात सुरू असलेल्या स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या मोहिमेविरोधात वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने महावितरणच्या नवापूर कार्यालयात निवेदन देण्यात आले. नियमांचे पालन न करता बसविण्यात आलेले स्मार्ट वीज मीटर काढून पूर्वीचे मीटर पुन्हा बसवावेत, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर आलेल्या वाढीव वीजबिलांची चौकशी करून त्यात दुरुस्ती करावी, तसेच प्रत्यक्ष मीटर रीडिंगनुसारच वीजबिले आकारावीत, अशा विविध मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. हे निवेदन वीज अभियंता एम.आर. शेख यांना देण्यात आले.**

वंचित बहुजन युवा आघाडीचे नवापूर तालुका युवा अध्यक्ष उमेश बापू पवार यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी महावितरण कार्यालयात जाऊन हे निवेदन सादर केले. नवापूर शहर व तालुक्यात मागील काही काळापासून मोठ्या प्रमाणावर स्मार्ट वीज मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. अनेक ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच मीटर बदलण्याबाबत स्पष्ट माहिती न देता मीटर बदलण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. काही ठिकाणी ग्राहक घरी उपस्थित नसतानाही जुने मीटर काढून स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर अनेक ग्राहकांना (पान ४ वर)

## सेवानिवृत्त पीएसआय रमेश साळुंखेंचे निधन



धुळे, दि.८- मुकटी(ता.धुळे) येथील सेवानिवृत्त पीएसआय रमेश बाबुलाल साळुंखे यांचे अपघातात निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते.यांची अंत्ययात्रा शुक्रवार दि.९ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी १० वा. त्यांच्या प्लॉट नं.५९ मार्डन नर्सरीसमोर जय हिंद चौक, जयहिंद कॉलनी देवपूर, धुळे येथील राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. धुळे तालुक्यातील मुकटी येथील रमेश बाबुलाल साळुंखे यांचा दि.८ ऑक्टोंबर २०२६ रोजी दुपारच्या सुमारास सुरत नागपूर-महामार्गावरील नंदाळे (मुकटी) फाटा मंगलदिप कोटेक्स (ता.धुळे) मोटारसायकलने जात असतांना झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,सुन असा परिवार आहे. रमेश साळुंखे धुळे ग्रामीणचे मा.आ.कुणाल पाटील यांच्या भगिनीचे व्याही होते.

## कायद्याची जनजागृती 'द पॉश अँण्ड पोक्सो' अवेअरनेस उपक्रमाचे दोंडाईचात उद्घाटन




**दोंडाईचा, दि.८- समुदाय सुरक्षितता आणि कायदेशीर शिक्षणातील एक ऐतिहासिक पाऊल म्हणून, महिला आणि बालकांवरील लैंगिक गुन्ह्यांविरुद्ध जनजागृती व संरक्षण करण्यासाठी समर्पित, तसेच सेक्शन कंपनी आणि (१२ए/८०जी) नोंदणीकृत असलेली भारतातील पहिलीच संस्था असलेल्या द पोश अँड पॉक्सो अवेरनेस फाऊंडेशनचा विशेष उद्घाटन सोहळा दोंडाईचा येथे यशस्वीपणे पार पडला.**

ही फाऊंडेशन लैंगिक गुन्ह्यांचे उच्चाटन करण्यासाठी, पॉश (कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा) व पॉक्सो ( बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा) नियमांची प्रभावी आणि संस्थात्मक अंमलबजावणी करण्यासाठी कायद्याची जनजागृतीला समर्पित एक प्रमुख संस्था आहे.

सौ. वैशाली नितीन अयाचित यांनी भाषणांच्या सत्राची सुरुवात केली, ज्यामध्ये त्यांनी फाऊंडेशनची मूळ दूरदृष्टी, महिला व बालकांच्या सुरक्षिततेची प्रकर्षाने जाणवणारी सामाजिक गरज आणि संस्थेचा मुख्य उद्देश विशद केला. सौ. सुप्रिया सुनील आरेकर (संचालक) यांनी यानंतर कार्यपद्धती, अंमलबजावणी धोरणे आणि संपूर्ण समुदायात जनजागृती विस्तारण्यासाठी तयार केलेल्या आगामी योजनांवर प्रकाश टाकला.

प्रमुख मार्गदर्शन व कायदेशीर मार्गदर्शन ॲड. स्नेहा सुनील आरेकर (संस्थापक आणि संचालक) यांनी मुख्य मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, ना. जयकुमार जितेंद्रसिंह रावल यांच्या हस्ते प्रकाशित झालेल्या पॉश आणि पॉक्सो कायद्यावरील पुस्तकाच्या त्या लेखिका आहेत. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात महत्त्वाच्या कायदेशीर यंत्रणा, वैधानिक तरतुदी, कॉर्पोरेट उत्तरदायित्व आणि पीडितांचे मानसिक सबलीकरण व पुनर्वसन यावर विशेष भर दिला. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला, ज्यामुळे ही फाऊंडेशन या प्रदेशात आणि देशभरात महिला व बालकांच्या हक्कांचे व संरक्षणाचे एक भक्कम व्यासपीठ म्हणून प्रस्थापित झाली आहे.

## आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्यांवर जळगावच्या भरारी पथकाची कारवाई

**धुळे, दि.८- वीज वाहिनीवर आकडे टाकून घरासाठी वीज चोरणाऱ्या साक्री तालुक्यातील अंबापुर, काशीपूर, देवनगर येथील एकतीस जणांवर कारवाई केली. वीज वितरण कंपनीच्या जळगाव येथील भरारी पथकाने छापा टाकला. संशयितांविरुद्ध साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

वीज वितरण कंपनीच्या जळगाव येथील भरारी पथकाने साक्री तालुक्यात विविध ठिकाणी पाहणी केली. अंबापुर येथे एकाच ठिकाणी असलेल्या रहिवाशांनी घरासाठी वीज चोरी केल्याचे आढळले. संशयितांनी त्यांचे घराचे जवळ असलेल्या एल टी लाईन वर आकडे टाकुन घरात अनाधिकृतपणे विज वापर केला. वीज कंपनीच्या भरारी पथकाने छापा टाकून कारवाई केली. ७७ हजार ४०० रुपयांची वीज चोरी केली होती. तडजोड बिल ३६ हजार रुपये दिलेले होते. विज चोरीचे बिल व तडजोड बिल दिले होते, ते बिल न भरल्याने संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. वीज कंपनीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता स्वप्नील अशोक माळी (रा. जळगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित सुनिता संतोष मारनर, सुका बाणु मारनर, पोपट चिंतामण मारनर, पंडीत धोंडून मारनर, दादाजी गंगाराम कराडे, आबा सुका मारनर, मोतीराम धमा डोमाले, दिलीप तुकाराम मारनर, संजय धागु मारनर, जिमा सोभा मारनर, उत्तम सोमा मारनर, तनु शिबा मारनर, रमेश धवळु मारनर, शिलाराम केरु मारनर, नथ्थु केरु मारनर, शांताराम नान्हु मारनर, लक्ष्मण सोनु कराडे, देवा भीमा मारनर यांच्याविरुद्ध साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार प्रमोद जाधव तपास करीत आहेत.

**काशीपूर, देवनगर येथे कारवाई**

काशीपूर (ता. साक्री) गावात पथकाने छापा टाकला. विठ्ठल गणुजी मारनर, (पान ४ वर)

## सागवान लाकूड तस्करीचा डाव उधळला तीन लाख बारा हजारांचा मुद्देमाल जप्त




**शहादा, दि.८ (प्रतिनिधी)- मिळालेल्या गुप्त माहितीनुसार वनविभागाच्या पथकाने पहाटेच्या सुमारास सावऱ्या-भमाणा रस्त्यावर कारवाई करून सागवान लाकडाची अवैध वाहतूक करणारे बोलेरो पिकअप वाहन जप्त केले. या कारवाईत सागाच्या चौकटींसह एकूण ३ लाख १२ हजार ६९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

दि.८ ऑक्टोबर रोजी पहाटे २ ते २.३० वाजेदरम्यान वनक्षेत्रपाल, बिलगाव (प्रा.) व वनक्षेत्रपाल, अक्राणी (प्रा.) तसेच बिलगाव व अक्राणी रेंजच्या कर्मचाऱ्यांकडून सावऱ्या-भमाणा रस्त्यावर गस्त सुरू होती. यावेळी बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच ३९ (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,100 रु.+3% GST
सोने- 24 K -1,49,000 रु.+3% GST
चांदी- 2,27,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

विनम्र अभिवादन



अण्णासाहेब पी.के.पाटील
परिसराचे भाग्यविधाते
सहकार व शिक्षणमहर्षी
अण्णासाहेब पी.के.पाटील यांच्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन ॥

-: अभिवादक :-
मा.श्री.बापूसाहेब दीपकभाई पाटील, अध्यक्ष
मा.श्री.जगदीश गिरधर पाटील, उपाध्यक्ष
मा.सौ.जयश्रीताई दीपक पाटील, मानद सचिव
मा.प्रा.मकरंद नगिन पाटील, समन्वयक
व सर्व संचालक मंडळ

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ, शहादा, जि.नंदुरबार

# आपला महाराष्ट्र

## शेतकरी मित्र,नटसम्राट नानांची शोचनिय अखेर

महाराष्ट्रातील नाट्यक्षेत्र तसेच सिने–क्षेत्रातील महनीय कलावंत म्हणून आपल्या आत्मविश्वासाने कलेचा अवकाश व्यापणारे आणि तमाम रसिकांची मने जिंकणारे नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी सकाळी समाज माध्यमातून तसेच दृक माध्यमातून झळकताच प्रथमदर्शनी या बातमीवर मन विश्वास ठेवण्यास तयार नव्हते कारण सोशल मीडियावर अशा पध्दतीच्या दिशाभूल करणाऱ्या बातम्या नेहमीच येत असतात म्हणून अनेकांनी विश्वासार्ह स्त्रोत तपासले आणि बातमी खरी असल्याचे लक्षात आले त्यामुळे कला क्षेत्रातील, विधायक क्षेत्रातील,स्वयंसेवी संस्थांच्या व्यवस्थापन क्षेत्रातील, राजकीय तसेच समाजातील विविध क्षेत्रातील अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. नानांनी त्यांच्या मनावर केलेल्या अधी राज्याचा तो परिणाम म्हणावा लागेल.तारुण्यापर्यंतची काही वर्षे सोडली तर नानांनी नाटक आणि चित्रपट क्षेत्रात कार्यरत असताना कधी मागे वळून बघितलेले नाही.म्हणूनच त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा भारत सरकारने पद्मश्री किताब बहाल करून सन्मान केला. महाराष्ट्र शासनाचा असो की,फिल्म फेअर अवार्ड असो. त्यांच्या कला साधने समोर ती देखील थिटी पडावीत एवढी त्यांची दिगंत कामगिरी होती.त्यांचा प्रवास कला क्षेत्रातील व खेड्यापाड्यातील झोपड्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या शेवटच्या माणसासोबत चालू होता .त्यांचा सततचा सामान्य माणसापासून सेलिब्रेटींपर्यंतचा वावर अगदी सहजपणे सुरू असल्यामुळे त्यांच्या अखेरच्या प्रवासाची कल्पना कोणीच करू शकत नव्हते. त्यांची मानसिक अवस्था तसेच शारीरिक अवस्था सुदृढ असल्याने तशी कल्पना कुणी करणे शक्यच नव्हते.तरीही रोज नित्यनेमाने व्यायाम करणारे नाना निघून गेले.त्यांच्या एकूण कारकीर्दीत त्यांनी बजावलेल्या कामगिरी मुळे ते समाधानी आणि तृप्त असले तरी अजून काही वर्षे ते सहजपणे काम करू शकले असते परंतु नियतीचा ते मान्य नसावे म्हणून त्यांचा प्रवास थांबला.

अनेकार्थाने त्यांची कारकीर्द आणि कार्य स्मरणात राहील तसेच इतिहासही त्यांची दखल घेईल यात शंका असण्याचे कारण नाही. बलदंड नटसम्राट, सिनेमातील विविध भूमिकांनी रसिकांच्या मनाचा ताबा घेणारा अभिनय ही त्यांची ठळक वैशिष्ट्ये होतीच पण त्याही पलिकडे नाना पाटेकर होते.त्या पलिकडचे त्यांचे व्यक्तिमत्त्व नाम फौंडेशनच्या कामातून महाराष्ट्राने बघितले. त्या त्यांच्या कामाची दखल राजकीय क्षेत्रातील अनेकांनी घेतली आणि त्या पध्दतीचे काम सुरू केले.ही मोठी उपलब्धी आहे.कलावंत म्हणून असंख्य अभिनेते,अभिनेत्री आपापल्या ठिकाणी खूप मोठे आहेत.अनेक आपल्या बलदंड कलाविष्कारांनी अजरामर झाले.अनेकांनी भरपूर पैसा कमावला.अनेक कलावंतांनी तो मनसोक्त खर्च करून त्याचा उपभोग घेतला.मात्र पुढील आयुष्याचा अर्थात वार्धक्यातील अवस्थेचा विचार न करता किंवा तसे नियोजन न करता आडमाप खर्च केला त्यामुळे अनेकांचा शोकांत शेवट झाला अशी अनेक उदाहरणे आहेत. पण काहींनी संपत्तीचा योग्य उपयोग करून आपले आणि आपल्या सोबत समाजातील उपेक्षितांच्या जीवनात प्रकाश वाटा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.त्याचे चांगले् दृश्य परिणाम दिसू लागले. डॉ.श्रीराम लागू, निळूभाऊ फुले या दिग्गज कलाकारांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम फार प्रभावीपणे केले. तसेच चळवळीतील कार्यकर्त्यांना आर्थिक बळ मिळावे यासाठी सामाजिक कृतज्ञता निधी निर्माण केला. तो आजही अस्तित्वात आहे. तो विधायक सेवेचा वसा पुढे आपल्या बळावर नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी घेतला.भरपूर अभिनय केला, खूप पैसा कमावला. आता समाजासाठी काही करूया. आपण या मातीचे काही देणे लागतो. या भावनेतून त्यांनी नाम फाऊंडेशनची स्थापना केली.उंची गाडी खरेदी करण्याचा इरादा रद्द करून तो पैसा विदर्भ मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना मदत करण्यात खर्च केला.पुढे त्यांनी या कामाचा व्याप वाढवत त्याचे रूपांतर चळवळीत केले.अनेक कार्यकर्ते तयार केले.लोकांनीही त्यांना मदत केली. आज महाराष्ट्रात जलसंधारण, नद्या नाले, तलाव पाझर तलाव आणि जलसाठे यांचे पुनरूज्जीवन करण्याचे मोठे काम झाले आहे. दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत आणि मुलांच्या शिक्षणासाठी सहकार्य, लोकांच्या सहकार्याने आणि दानवीरांच्या दातृत्वाने नाम फाउंडेशनने दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. पाण्याचे स्त्रोत वाढलेले आहेत. अशाप्रकारे नानांनी आणि अनासपुरे यांनी आपल्या लोकप्रियतेचा योग्य उपयोग केलेला आहे. याच पद्धतीचे काम पाणी फाउंडेशन च्या माध्यमातून आमिर खान यांनी केलेले आहे.

अशाप्रकारे कलावंतांनी कमावलेली लोकप्रियता आणि पैसा यांचा योग्य उपयोग करण्याची अलीकडची ही ठळक उदाहरणे आहेत. त्यात नाना पाटेकर यांचा मोठा वाटा आहे. एवढा मोठा कलावंत असूनही जमिनीवर राहून सर्वसामान्य माणसांमध्ये सहजपणे मिसळून जाणे आणि त्यांना तो आपला वाटणे हे त्यांच्या जीवनाचे भाग ध्येय ठरले आहे. त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीबद्दल फारसे कोणाला माहिती नाही. ते स्वतः त्याबद्दल भाष्य करीत नसत. त्यांचे मूळ नाव विश्वनाथ पाटेकर. एक जानेवारी १९५१ रोजी मुरुड जंजिरा येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील दत्तात्रय पाटेकर चित्रकार होते आणि आई संजना गृहिणी होत्या. मुंबईत त्यांचे बालपण गिरण गावात गेले. लहानपणापासूनच त्यांनी संघर्ष केला नीलकांती असे त्यांच्या पत्नीचे नाव आहे आणि मल्हार हा त्यांचा चिरंजीव आहे. त्यांच्या अभिनयाची सुरुवात रंगभूमीपासून झाली. त्यांच्या अनुभवाच्या आधारे आणि देहबोलीच्या आधारे त्यांच्या अभिनयात विलक्षण ताकद दिसून आली.अंकुश, प्रतिघात, प्रहार, तिरंगा, परिंदा, खामोशी, अबतक छप्पन, अपहरण, क्रांतिवीर हे त्यांचे गाजलेले चित्रपट असून त्याच्यातील भूमिका लक्षवेधी ठरलेल्या आहेत .त्यांनी साकारलेला डॉ.प्रकाश बाबा आमटे हा मराठी चित्रपट अख्ख्या महाराष्ट्राने डोक्यावर घेत त्यास मनोमन वंदन केले.परिंदा, क्रांतिवीर आणि अग्नीसाक्षीच्या अभिनयातील कौशल्यामुळे त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त झाले. स्टेजवर अनेकांनी नटसम्राट या नाटकातील गणपतराव बेलवलकर या पात्राची व्यक्तिरेखा साकार केली आणि अजरामर केली. परंतु नाना पाटेकर यांचा गणपतराव सर्वांनी लक्षात ठेवावा असाच होता. विशेषत: नटसम्राट या चित्रपटात त्यांची कामगिरी उजवी ठरली. एखाद्या रंगकर्मीच्या आयुष्यातील संघर्ष आणि एकाकीपणा त्यांनी फार ताकदीने सरकारला. समाजातील सर्व थरातील रसिकांना आवडेल अशा व्यक्तिरेखा त्यांनी सिनेमातून मोठ्या केल्या. नकारात्मक भूमिकांबद्दल ते प्रसिद्ध होते तरीही भावनिक आणि विनोदी भूमिका देखील त्यांनी केला आणि त्यातही आपण कमी नसल्याचे दाखवून दिले. नाना केवळ लोकप्रिय अभिनेतेच नव्हेत तर त्या क्षेत्रातील सचोटी, त्यातील शिस्त, साधेपणा आणि शेवटच्या माणसाची जाणीव असणाऱ्या सर्व प्रकारच्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करून त्यांनी ज्या साकारल्या. सैनिकी पेशा काही काळ त्यांनी स्वीकारला होता. त्या कामातील सिनेमा साकारण्यासाठी त्यांनी कॅप्टन आणि सैनिकाची भूमिका शिकून घेतली. नंतरच ते चित्रपट केले.

त्यांची भाषणे नाम फाउंडेशनच्या माध्यमातून खेड्यापाड्यात गाजली. लोकांना ती मनापासून आवडली कारण लोकांच्या जीवनाची परिभाषा त्यांनी आ–ळखली होती आणि त्याच पद्धतीने ते बोलत होते. त्यांनी उभे केलेले कार्य आता मकरंद अनासपुरे यांच्या खांद्यावर असले तरी तेही एकटे नाहीत विदर्भ मराठवाड्यात आणि उर्वरित महाराष्ट्रात त्यांनी अनेक विधायक कार्यकर्ते निर्माण केले आहेत. त्यामुळे त्यांच्यानंतर या कामात पोकळी निर्माण झाली असे म्हणण्यास वाव नाही. भारतीय चित्रपट सृष्टी आणि मराठी नाट्यसृष्टीचे मात्र फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून ते भरून निघणे सोपे नाही.त्यांचे निधन शोचनिय आहे. त्यांच्या रुपाने सच्चा शेतकरी मित्र आणि बलदंड नटसम्राट अंतर्धान पावला आहे.त्यांच्या व्यक्तिमत्वास अखेरचा सलाम.

# सत्यशोधक शेतकरी सभेचा वनहक्क दावे व दुष्काळी मदतीसाठी आक्रमक पवित्रा

**नंदुरबार (प्रतिनिधी) : नंदुरबार जिल्ह्यातील प्रलंबित तसेच जिल्हास्तरीय वनहक्क समितीने फेटाळलेल्या वनहक्क दाव्यांची फेरतपासणी करून ते तातडीने निकाली काढावेत, पात्र दावेदारांना वनहक्क प्रदान करावेत तसेच मंजूर वनहक्कधारकांना ७/१२ अभिलेख व वनपट्टे देण्यात यावेत. २१ ऑक्टोबरपर्यंत मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक बिढार महामोर्चाचा इशारा सत्यशोधक शेतकरी सभेने अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने १० सप्टेंबर २०२६ रोजी काढलेल्या शासन परिपत्रकानुसार वनहक्क दाव्यांवर कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामस्तरापासून उपविभागीय व जिल्हास्तरीय समित्यांकडे प्रलंबित असलेले दावे तातडीने निकाली काढावेत, पात्र दावेदारांना वनहक्क द्यावा तसेच मंजूर वनहक्कधारकांना ७/१२ अभिलेख व वनपट्टे देण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

तसेच नंदुरबार जिल्ह्यात सुरू असलेल्या दुष्काळी पीक नुकसान पंचनाम्यांमध्ये वनपट्टेधारक तसेच वनहक्क दावे प्रलंबित असलेल्या प्रत्यक्ष शेती करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांची पिके वगळू नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ फार्मर आयडी उपलब्ध नसल्याच्या तांत्रिक कारणामुळे पात्र शेतकरी व वनहक्क दावेदारांना दुष्काळी मदतीपासून वंचित ठेवू नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

वनहक्काची जमीन असल्याच्या कारणाने कोणत्याही शेतकऱ्याच्या उभ्या पिकांचे पंचनामे नाकारू नयेत. ग्रामपंचायतनिहाय वनपट्टेधारक व प्रलंबित वनहक्क दावेदारांची यादी तयार करून प्रत्यक्ष शेतावर जाऊन पीक नुकसान पंचनामे करावेत, अशी मागणी सत्यशोधक शेतकरी सभेने केली आहे.

दरम्यान, २१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दोन्ही निवेदनांतील मागण्यांची ठोस अंमलबजावणी झाली नाही, तर नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक बिढार महामोर्चा काढण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला. हा मोर्चा लोकशाही मार्गाने मोठ्या संख्येने वनहक्क दावेदार, शेतकरी व कष्टकऱ्यांना सोबत घेऊन काढण्यात येईल, असेही संघटनेने स्पष्ट केले.

यावेळी कॉम. आर. टी. गावीत, कॉम. शीतल गावीत, कॉम. दिलीप गावीत, कॉम. विक्रम गावीत, कॉम. जालमसिंग गावीत, कॉम. राजेश गावीत, कॉम. उत्तम गावीत, कॉम. सेल्या गावीत, कॉम. रामदास गावीत, कॉम. गोबजी गावीत, सुरेखाबाई आडवी, मनिला गावीत, सुनील गावीत, राजू गावीत, नवलसिंग गावीत, प्रभाकर गावीत यांच्यासह सत्यशोधक शेतकरी सभेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**NAME CHANGE**

MY PREVIOUS NAME WAS
**GULAM SUFI MOHAMMAD HUSEN KURAISHI**
AND MY NEW NAME IS
**GULAM SUFI MOHAMMAD HUSAIN QURESHI**
ADD- 141 VADJAI ROAD KABIR GANJ NEAR HABIBI URDU SCHOOL DHULE-424001. M.S.

**CHANGE NAME**

MY OLD NAME WAS
**SUFIYA BANO FAKIR MAHAMMAD SHAIKH**
MY NEW NAME IS
**SUFIYA BI ABDUL RASHEED TAMBOLI**
ADD- 170, NEAR KUBA MASJID, DURBAL GHATAK SOCIETY, DHULE.

**प्रकाश में आज- बंधे हाथ**



अमिताभ मुमताज अजीत रंजीत मदन पुरी अंजना राममोहन कुमूद छुग्गानी

**जाहीर नोटीस** नि.७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज ९२५/२०२६

**बाळुसिंग रघुनाथ राजपूत** .....अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .....जाबदेणार
**भिकुबाई रघुनाथ राजपूत** ....- मयत
**रा.जापोरे ता.शिरपूर जि.धुळे**

ज्याअर्थी अर्जदार यांच्या आई भिकुबाई रघुनाथ राजपूत ह्या दिनांक ११/०५/२०२६ रोजी मौजे जापोरे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाल्या,त्याअर्थी अर्जदारांना मयताचे वारस लावण्यासाठी तसेच वारसांना शासकीय–निमशासकीय कामासाठी मयताचा वारस दाखला लागणार असल्याने वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरील अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणाची हरकत, तक्रारी असेल त्यांनी आपली हरकत, तक्रार स्वतः अगर वकीलामार्फत हजर होवून दि.३०/११/२०२६ पावेतो सकाळी १.३० वाजता कोर्टात मांडावी. तसे न केल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजले जाईल व वरील वारसांच्या नावाने वारस दाखला देण्यात येईल.

आज रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.
दि.२८/०९/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** कोर्टाचा शिक्का **अधिक्षक**
शिरपूर कोर्ट शिरपूर, कोर्ट

**जाहीर समन्स** ॲड.हर्षल भा.अहिरराव

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज नं. ३२०/२०२६**

**श्रीमती.अरूणाबाई महारु देसले वगैरे ४** -----अर्जदार

विरूद्ध

**कै.महारु बाबुराव पाटील देसले**
रा.खरेदी–विक्री संघ जवळ,
शिंदखेडा, ता.शिंदखेडा,जि.धुळे -----मयत

**वारस दाखला** (Heirship Certificate) **मिळणेसाठी अर्ज**

ज्या अर्थी अर्जदार क्र. १) श्रीमती. अरूणाबाई महारू देसले ही पत्नी या नात्याने तसेच अर्जदार क्र. २) श्री. निलेश महारू देसले, अर्जदार क्र. ३) श्री. पंकज महारू देसले, अर्जदार क्र ४) श्री. योगेश महारू देसले, अर्जदार क्र. ५) श्री. प्रसाद महारू देसले हे मुले या नात्याने मयत कै. महारू बाबुराव पाटील (देसले) यांचे वारस असल्याने मयताचे मृत्यु पश्चात वारस दाखला मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. मयत कै. महारू बाबुराव पाटील (देसले) हे मयत असुन मयताचे अनुक्रमे अर्जदार क्र १ ते ५ हे पत्नी, मुले आहेत, त्याशिवाय दुॅसरे कोणीही वारस नाही. असे त्याचे कथन आहे. मयत कै. महारू बाबुरावा पाटील (देसले)हे दि.२५/०२/२०१९ रोजी मौजे शिंदखेडा ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झालेले असुन मयत कै.महारू बाबुराव पाटील (देसल) यांचे नावाला शासकीय, प्रशासकीय तसेच इतर महत्त्वाचे कामासाठी नावे लागणेकामी अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस म्हणुन नाव लावण्यासाठी वारस दाखला दाखल केलेला आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस या जाहिर संमन्स द्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जाचे कामी सुनावणी तारीख १६/११/२०२६ ठेवण्यात आली आहे. तरी या न्यायालयात वरील वारस दाखला देण्याबाबत कोणाची हरकत असल्यास इतर हितसंबध असल्यास या न्यायालयात दि.१६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून आपले म्हणणे सादर करावे. वरील तारखेस व वेळी कोणाची हरकत न आल्यास निर्णय देण्यात येईल. मग नंतर काही एक तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर संमन्स नोटीस न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.
शिंदखेडा दि.०७/१०/२०२६

सही...
सहाय्यक अधिक्षक
कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर शिंदखेडा

**जाहीर नोटीस** नि.०७ ॲड. विशाल मेटकर

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ८९०/२०२६

**१) मगण भावसिंग पावरा २) सागर मगण पावरा**
**३) कृष्णा मगण पावरा**
अ.नं.१ हा स्वतःसाठी व अ.नं. २ व ३ यांचा अ.पा.क वडील म्हणून.
**४) चंदा सागर पावरा सर्व रा.हातेड ता.शिरपूर जि.धुळे .....अर्जदार**

विरुद्ध

**कोणीही नाही.** .....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार मगण भावसिंग पावरा वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे संगिता मगण पावरा ह्या दि.०९/११/२०२५ रोजी मौजे हातेड ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता. अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे संगिता मगण पावरा यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.०२/११/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आदेशावरून

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

**जाहीर नोटीस** नि.०७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. सि. डी. यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ८८३/२०२६**

**१ जिजाबाई बारकु मराठे**
**२ गोपाल बारकु मराठे**
**नं. १ व २ रा.हनुमान मंदिराजवळ मराठे गल्ली**
**शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे .....अर्जदार**

विरूद्ध

**कोणीही नाही.** .....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार जिजाबाई बारकु मराठे वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे बारकु कौतिक मराठे हे दि.०४/११/२०२१ रोजी मौजे किंग इडवर्ड हॉस्पीटल येथे उपचारादरम्यान मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखला केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे बारकु कौतिक मराठे यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२०/११/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजात मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.
आदेशावरून

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

**जाहीर नोटीस** नि.०७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी. डिव्ही. यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज नं. ९२१/२०२६**

**१) सुभद्राबाई हिलाल भिल २) गरबड हिलाल भिल**
**३) अशोक हिलाल भिल ४) भुरा हिलाल भिल**
**५) शेंपा हिलाल भिल नं.१ ते ५ रा. बाळदे ता.शिरपूर जि.धुळे**
**६) सुनंदा छोटू भिल रा.अर्थे बु, ता.शिरपूर जि.धुळे**
**७) मंगलाबाई बारकु सोनवणे रा.कंचनपूर ता.शिंदखेडा जि.धुळे**
**८) गुंताबाई अनिल भिल रा.बाळदे ता.शिरपूर जि.धुळे .....अर्जदार**

विरूद्ध

**कोणीही नाही.** .....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार सुभद्रबाई हिलाल भिल वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे हिलाल खंडु भिल हे दि.११/०९/२०२५ रोजी बाळदे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे हिलाल खंडु भिल यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२४/११/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरून

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

**जाहीर नोटीस** नि.०७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ९०८/२०२६

**१) सुशिलाबाई बिहारीलाल पावरा २) विजय बिहारी पावरा**
**३) ललिता रविंद्र पावरा ४) सलिता परविन सोलंकी,**
**सर्व रा. हाडाखेड, पो.सुळे ता.शिरपूर जि. धुळे ---अर्जदार**

विरूद्ध

**कोणीही नाही** ...जाबदेणार

x

**बिहारीलाल शंकर पावरा** (मृत्यू ता. १२/०५/२०२६)
रा. हाडाखेड पो. सुळे ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी मयत कै. बिहारीलाल शंकर पावरा हे दि. १२/०५/२०२६ रोजी मौजे हाडाखेड ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारिक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०५/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून, हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.
दि. २३/०९/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

**जाहीर नोटीस** नि.०७ ॲड. विशाल मेटकर

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु. डी. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ८८४/२०२६

**दिलीप ताराचंद कुंभार**
रा. चौधरी गल्ली वरचे गाव ता.शिरपूर जि. धुळे ---अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ---जाबदेणार

मयत कै. शांताबाई ताराचंद कुंभार यांचा मृत्यू दि. ११/५/२००८ रोजी मौजे चौधरी गल्ली वरचे गांव ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला आहे. अर्जदार यांनी मे. शिरपूर येथील सिव्हील जज्ज सो. जु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे अर्ज केला असून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असून शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखला मागितला आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व वारसाबाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०४/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. प्रत्यक्ष वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल. दि. २२/०९/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे




**जाहीर नोटीस** नि.७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनी डिव्हीजन. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज ९०४/२०२६

१ शांताबाई रघुनाथ माळी उ.व.८१,धंदा–घरकाम
२ सुरेखा बापू माळी उ.व.४४, धंदा–घरकाम
३ गौरव बापू माळी उ.व.२५, धंदा–व्यापार
४ अंकिता बापू माळी उ.व.२४, धंदा–शिक्षण
वरील सर्व रा. गवळी वाडा, शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे .....अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .....जाब देणार
**बापू रघुनाथ माळी** ... मयत
रा.गवळी वाडा, शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे

अर्जदार नं.१ चा मुलगा, अर्जदार नं. २ चे पती, व अर्जदार नं. ३ ते ४ यांचे वडील बापू रघुनाथ माळी हे दिनांक ०९/०८/२०२६ रोजी मौजे शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाले, त्याअर्थी अर्जदारांना मयताचे वारस लवण्यासाठी तसेच वारसांना शासकीय–निमशासकीय कामासाठी मयताचा वारस दाखला लागणार असल्याने वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरील अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणाची हरकत, तक्रारी असेल त्यांनी आपली हरकत, तक्रार स्वतः अगर वकीलामार्फत हजर होवून दि.०२/११/२०२६ पावेतो सकाळी १०.३० वाजता कोर्टात मांडावी. तसे न केल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजले जाईल व वरील वारसांच्या नावाने वारस दाखला देण्यात येईल.

आज रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.
दि.२३/०९/२०२६सही...
सही...

**कनिष्ठ लिपीक** कोर्टाचा शिक्का **सहा. अधिक्षक**
शिरपूर कोर्ट शिरपूर कोर्ट

**जाहीर नोटीस**

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्यु. डी.) यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ८८६/२०२६

**१) सोनू झिपरु मराठे, २) मारुती उर्फ देविदास झिपरु मराठे**
**३) रेखा नरेंद्र मराठे, ४) गणेश नरेंद्र मराठे,**
**५) पवन नरेंद्र मराठे ६) किरण दिपक चव्हाण**
**७) यमुनाबाई रमेश मराठे** ---अर्जदार

॥ विरूद्ध ॥

कोणीही नाही ---जाबदेणार

ज्याअर्थी मयत शांताबाई झिपरु मराठे ह्या दि. ०६/०६/२०२६ रोजी मौजे शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेल्या असून आता अर्जदार नं. १ ते ७ यांना शासकीय व निम शासकीय कामासाठी अर्जदार नं. १ ते ७ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ चे कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०२/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होउन हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २२/०९/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

**जाहीर नोटीस** नि.०७ ॲड. विशाल मेटकर

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु. डी. यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ८८३/२०२६

**१) उषा पितांबर मोरे, २) ज्ञानेश्वर पितांबर मोरे,**
**३) विशाल पितांबर मोरे, ४) वैशाली हरिचंद्र भिल,**
**५) रेखा किरण भिल** ---अर्जदार

॥ विरूद्ध ॥

कोणीही नाही ---जाबदेणार

कै. पितांबर बंडू मोरे यांचा मृत्यू दि. १८/६/२०२३ रोजी मौजे दहिवद ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला असून अर्जदार नं. १ ते ५ यांनी मे. शिरपूर येथील सिव्हील जज्ज सो. ज्यु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ प्रमाणे अर्ज केला असून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असून शासकीय व निम शासकीय कामासाठी वारस दाखला मागितला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व वारसबात किंवा/ कुणाची काही हरकत/ आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २७/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल. दि. २२/०९/२०२६

सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे कोर्टाचा शिक्का दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे




# धुळे महानगरपालिका, धुळे

**विद्युत विभाग- ई-निविदा सूचना क्र.१२६ सन २०२६-२७**

मा. आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे हे मनपा निधी सन २०२६-२७ अंतर्गत विद्युत विषयक एकूण २ काम ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) पात्र कंत्राटदार निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करतील अशा कंत्राटदारांकडुन **B_1** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) **B1 Percentage Rate** नुसार निविदा दर मागवीत आहोत. या निविदांची संपूर्ण माहिती व निविदा दि.०९/१०/२०२६ रोजी संध्याकाळी १७.०५ ते दि.१६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो डाऊन लोडिंगसाठी https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर कामांची निविदा दि.१९/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

प्राप्त होणाऱ्या निविदापैकी एक किंवा सर्व निविदा स्वीकारणेचे अथवा नाकारण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांचेकडे राहतील.

जा.क्र./धुमपा/वि.वि./२३९/२०२६-२७
दिनांक- ०८/१०/२०२६

**उपायुक्त**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

## जाहीर नोटीस टायटल व्हेरिफिकेशन

तमाम लोकांना, बँक, पतपेढी व सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, धुळे महानगरपालिका हददीतील, देवपुर येथील स.नं. ५७+५८ पैकी प्लॉट नं.३ चे एकूण क्षेत्र २५०.४२ चौ.मी. २७०० चौ.फुट यास वि.सि.स.नं. ७३८९ सत्ताप्रकार क चे एकूण क्षेत्र २५१ चौ.मी. या पैकी तुम्हास कायम खरदी देण्याचा सौदा केला ते आमचे मालकीचे पूर्वे कडील भागाचे क्षेत्र १२५.४२ चौ.मी. १३५० चौ.फुट यामध्ये सुमारे २१ वर्षापूर्वीचे आर.सी.सी. चे दुमजली बांधीव घराचे एकुण क्षेत्र २७०० चौ.फुट बाकी बखळ जागेसह या मिळकतीस चतु:सिमा मंजूर अंतिम अभिन्यास नकाशानुसार खालील प्रमाणे-

| यासी | मापे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुर्वेस | २२.६ फुट | प्लॉट नं.४ |
| पश्चिमेस | २२.६ फुट | याच प्लॉट नं.३ चा उर्वरीत भाग |
| दक्षिणेस | ६० फुट | वापर व पुढे बोळ रस्ता |
| उत्तरेस | ६० फुट | लागून वापर व पुढे रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील आर.सी.सी. चे दुमजली बांधीव घर व बखळ प्लॉटचे एकत्रित मालक सौ.मिनाबाई गुलाबराव कचवे, व श्री.गुलाबराव साहेबराव कचवे दोघेही रा. प्लॉट नं.३, विद्यानगर, देवपूर धुळे यांचेकडून आमचे अशिल अनिता माधवराव निकवाडे रा., घर नं. १८६, आनंद नगर, भोई सोसायटी, देवपूर, धुळे यांनी बयाणा रक्कम देवून कायमस्वरूपी खरेदी करावयाचा लेखी सौदा केलेला आहे व लवकरच आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी व्यवहार पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हिस्सा अगर हित संबंध असल्यास तसेच कोणताही प्रकारचा गहाण, तारणाचा अगर अन्य प्रकारचा बोजा असल्यास तसेच सदर मिळकत कोणास दान, बक्षिस, भाडे करारनामे, मुखत्यार पत्र, सौदा पावती म्हणून देण्यात आ-लेले असल्यास अगर कोणाचा अन्न, वस्त्र खावटीचा बोजा असल्यास तसेच मोज-मापा संबंधी काही तक्रार असल्यास अगर सदर मिळकीचे खरेदीच्या व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकती, त्यासंबंधी लेखी दस्तऐवजे पुराव्यासाठी सत्य झेरॉक्स प्रतीसह आमचेकडे खालील पत्त्यावर संपर्क साधावा. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध असल्याचे ग्राहय धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणा-या हरकती आमच्या अशिलावर व अगर मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

ही जाहीर नोटीस धुळे येथे दिनांक ०९/१०/२०२६ राजी आमचे मार्फत आमच्या अशिलांचे सांगणेवरून प्रसिद्ध केली असे.

**ॲड.रमेश चैत्राम शिंदे** नोटरी (भारत सरकार)
गरुड कॉम्प्लेक्स, गाळा नं. ३१, तळमजला कमलाबाई शाळेसमोर, धुळे
**मो. ९४२३२८७८६३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन : मौजे महिंदळे येथील स. नं. ८३/१ पैकी प्लॉट नं. ८३ यास विस्तारीत सि. स. नं. ३५१४ सत्ता प्रकार क चे एकूण क्षेत्र २२६.७० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भाग चे क्षेत्र ११३.३५ चौ. मी. बखळ प्लॉट.**

**यासी चतु:सिमा**

**पुर्वेस : स. नं ८४ पै. पश्चिमेस : रस्ता**
**दक्षिणेस : याच प्लॉटचा उर्वरित भाग उत्तरेस : स. नं. ५३**

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल **यांनी मिळकतीचे मालक अलका राहुल हेबाडे** रा. ९०, जय मल्हार नगर, साक्री रोड धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी - विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ०८/१०/२०२६

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रुम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तिय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे धुळे येथिल स. नं. ४९४/३ पैकी प्लॉट नं.१ यांस वि. सि. स. नं.९३५२ चे एकुण क्षेत्र ४०५.३० चौ.मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ९३.७५ चौ.मी.चा बखळ प्लॉट,त्यासी चतु:सिमा-पुर्वेस-९ मी रस्ता,पाश्चिमेस- स.नं.४९४/२,उत्तरेस-याच प्लॉट चा उर्वरित भाग, दक्षिणेस-प्लॉट नं.२, येणे वर्णनाचा आतील मिळकत ही श्री.बापु गुलाब बागले रा.लक्ष्मीवाडी,दुधडेअरी रोड, रेल्वेगेट जवळ,धुळे, यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असुन बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी,पतसंस्था,वित्तिय संस्था,सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, मिळककतीवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क,हिस्सा,टांच,गहण,जप्ती,वहिवाटी हक्क किंवा सदर मिळकती संबधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री, पावती, खरेदीखत करूण दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ सात दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर निर्वेध व निर्बोज समजुन आमचे अशिल सदरहु मिळकती चा व्यवहार करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सुचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे दिनांक ०८/१०/२०२६ स्थळः धुळे

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग. नं.४ भांडी बाजार,कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे
मो.७७०९७७२७५७/७५८८८८४१०७

## झाडे लावा झाडे जगवा

### NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS **MOHAMMAD IMRAN AKHTAR HUSAIN ANSARI** AND MY NEW NAME IS **MOHAMMED IMRAN AKHTAR HUSAIN ANSARI**
ADD- PLOT NO.21, VADJAI ROAD MUSLIM NAGAR, DHULE-424001. M.S.

### CHANGE NAME

MY OLD NAME WAS **A RASHID SK BABU** MY NEW NAME IS **ABDUL RASHEED SHAIKH BABU TAMBOLI**
ADD- 170, NEAR KUBA MASJID, DURBAL GHATAK SOCIETY, DHULE.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतपेढी, वित्तीय संस्था, संबंधितास, मिळकतीचे मुळ मालक, तसेच मिळकतीबाबत व त्यांचेकडेस या मिळकतीबाबत हक्क दाखविणा-या सर्व वारसांस तसेच इतर कुठल्याही स्वरूपाचा व्यवहार करणार सर्व संबंधितांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार **श्री. रजनीश अशोक निंबाळकर व सौ.ज्योर्तीबाला रजनीश निंबाळकर** दोघे रा.धुळे यांनी उता-यावरील मालक **श्री.निलेश हजारीमल जैन** (एच.यु.एफ) रा.१, अग्रवाल नगर, भतवाल हॉस्पीटल जवळ, मालेगांव रोड, धुळे यांचे सोबत **१. मौजे धुळे शहर येथील स.नं.३९९ पैकी प्लॉट नं.९२ चे क्षेत्र ६७.५० चौ.मी. सत्ता प्रकार-क बखळ प्लॉट अशी मिळकत २.मौजे धुळे शहर येथील स.नं.३९९ पैकी प्लॉट नं.९१ चे क्षेत्र ६७.५० चौ.मी. त्यास धुळे शहर विस्तारीत** सि.स.नं.१०७२२ चे क्षेत्र ६७.५० चौ.मी. रस्ता प्रकार-क बखळ प्लॉट अशी मिळकत त्यांसी प्रत्यक्ष जागेनुसार मापे व चतृ:सिमा खालील प्रमाणे आहे व राहील.

| | प्लॉट नं.९१ | प्लॉट नं.९२ |
|---|---|---|
| पुर्वेसः- | प्लॉट नं. ९० | प्लॉट नं. ९१ |
| पश्चिमेस :- | प्लॉट नं. ९२ | ३ मी.रुंदीचा रस्ता |
| दक्षिणेस :- | ९ मी. रस्ता | ९मी.रुंदीचा रस्ता |
| उत्तरेस :- | प्लॉट नं. ८१ | प्लॉट नं. ८० |

अश्या मिळकतीचा कायम खरेदी घेण्याचा सौदा सौदा देणार यांचे सोबत केलेला असुन, आमचे पक्षकारांनी केला असुन सौदा देणार यांना काही रक्कम बयाणा म्हणुन देखील दिलेली असुन, सौदा करून घेतलेली आहे, आमचे पक्षकार लवकरच व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर नोटीस ही टायटल व्हेफिकेशन नोटीस आहे.

सबब सदर मिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी हितसंबंध, तसेच विक्री अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, मृत्युपत्र, करार, जप्ती, आरक्षण किंवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी, अत्यंदान, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश, स्थगिती आदेश/हुकूमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण-घेवाण, बेचेन-पत्र, कर्ज फिटेपर्यत मिळकत ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि/ अथवा स्वारस्थ असलेले पतदार, आणि/अथवा लेंडर, समाविष्ठ असलेले किंवा नसलेल्या व्यक्तींची संस्था किंवा व्यक्तीची असोसिएशन, वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी, स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणताही प्रकारचा हक्क असेल किंवा वर नमूद मिळकतीचा कोणताही भाग किंवा त्याच्या हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप, असल्यास कृपया लेखी स्वरूपात पुष्टयर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आक्षेप / हरकती नोंदवाव्यात. मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्राशिवाय आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून त्यांच्यावतीने आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात येत आहे. कळावे ही जाहीर नोटीस, धुळे दि. ०८/१०/२०२६

**ॲड.गणेश एन. वाघ**
पत्ता : मु. पो. सौंदाणे ता. जि. धुळे मो. ९०९६३४९९६२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था, खाजगी सावकार, भागिदारी फर्म सोसायटी, धर्मदाय व सहकारी संस्था यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे विंचुर, ता.जि.धुळे येथील गट नं.१५६/२ ब, क्षेत्र ला ला. हे.१:०३ आर, पो.ख. हे. ० : ०० आर, एकुण क्षेत्र हे. १ : ०३ आर, आकार रू.२.५० पैसे, यासी चतु:सिमा : पुर्वेस : राष्ट्रीय महामार्ग क्र.२११(धुळे-चाळीसगाव रस्ताा) पश्चिमेस : राजधर, सुकलाल बोरसे यांची शेत जमिन, दिक्षिणेस : विंचुर ते शिरूड रोड, उत्तरेस, साहेबराव भदाणे यांची शेत जमिन. ही मिळकत **१) सुबोधसिंह रतनसिंह चौहान (राजपुत), २) सुनिल रतनसिंह चौहान (राजपुत), ३) सुभाष रतनसिंह चौहान (राजपुत) व ४) सुनिता गोपालसिंह परदेशी** यांच्या समाईक मालकीची व कब्जे उपभोगातील असून सदर मिळकत आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा व्यवहार केलेला आहे व लवकरच खरेदीखत नोंदविणार आहेत. म्हणुन सदर मिळकतीवर कोणाचाही काहीही हक्क, अधिकार, लिज, टाच, बोजा, जप्ती, बक्षिस, गहाण, खरेदी, विक्री, ताबा, हस्तांतरण, करार अगर हिसंबंध असल्यास किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार असल्यास किंवा सदर मिळकतीचे खरेदीबाबत कोणाचीही काहीही हरकत, अडथळा असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर लेखी व मुळ दस्तऐवजांसह हरकत नांदवावी. परस्पर वर्तमान पत्रात जाहिर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

मुदतीत लेखी म्हणणे सादर न केल्यास वरील मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे. असे गृहित धरून या मिळकतीबाबत कोणाचीही काहीही हरकत नसल्याचे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार करतील. तसेच या नोटीसीस कुणाचेही काहीही म्हणणे किंवा हरकत, कोणीही परस्पर वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्यास ती आमचे अशिल व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. धुळे. दि.०८/१०/२०२६

**ॲड.जागदिश जी. सुर्यवंशी** मो. ९४२०८६४९१३
रा. गाळा क्र. १६ लोकशाहीर आण्णाभाऊसाठे व्यापारी संकुल फाशीपुल, धुळे

# संमिश्र

## बर्वे छात्रालयात म.गांधींवर आधारीत कार्यक्रम

धुळे, दि.७- महापालिकेचे सचिव मनोज कुंदा अरविंद वाघ यांच्या सेवानिवृत्ती बद्दल दि.९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे सहा वाजता महाराष्ट्र राज्य हरिजन सेवक संघ, राष्ट्र सेवा दल आणि सुवर्णकार युवक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बंदे में है दम या कार्यक्रमाचे आयोजन शहरातील बर्वे छात्रालय येथे केले आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना हर्षल पाटील यांची असून दिग्दर्शक नारायण बाविस्कर आहे तर संगीत दिग्दर्शक मंजुषा भिडे व सुदीप्ता सरकार आ-हेत. निर्मिती प्रमुख मधुकर शिरसाट व मंगेश कुलकर्णी आहेत. सुप्रसिद्ध रंगकर्मी शंभू पाटील हे या कार्यक्रमात गांधी उलगडून सांगणार आहेत.

### NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS **PARVIN BANO GULAM SUFI KURAISHI** AND MY NEW NAME IS **PARVEEN BANO GULAM SUFI QURESHI**
ADD- 141 VADJAI ROAD KABIR GANJ NEAR HABIBI URDU SCHOOL DHULE-424001. M.S.

### NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS **IBRAHIM GULAM SUFI KURAISHI** AND MY NEW NAME IS **MOHAMMAD IBRAHIM GULAM SUFI QURESHI**
ADD- 141 VADJAI ROAD KABIR GANJ NEAR HABIBI URDU SCHOOL DHULE-424001. M.S.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे भोकर, ता.जि. धुळे येथिल गट नं.२०३/१ पैकी प्लॉट नं.१९ चे क्षेत्र १६६.५० चौ.मी.** यांसी चर्तु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.१८, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं.२०. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **१) नारायण जयराम पाटील २) वसंत जयराम पाटील ३) नंदकिशोर जयराम पाटील ४) राजेंद्र जयराम पाटील,** सर्व रा.भोकर,ता.जि.धुळे यांचे मालकीची असुन त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल **श्री.यशोदिप नथ्थू धनराळे**,रा.दुसाणे,ता.साक्री,जि.धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे / घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे : दिनांक : ०८/१०/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी -भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे **मो. ९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भोकर,ता.जि.धुळे येथिल गट नं.१९६ पैकी प्लॉट नं.२४ चे क्षेत्र २३०.३१ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.२२ व २३, दक्षिणेस : प्लॉट नं. २५, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) संदीप मुकुंदा बाविस्कर, रा.१२४ ब, नाटेश्वर कॉलनी धुळे २) पंकज किसन भारस्कर, रा. १५४ अ, नाटेश्वर कॉलनी, धुळे ३) सुजित शामकांत पाटील, रा.४२, युगंधर सोसा, देवपुर, धुळे यांचे मालकीची असुन त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे / घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तस दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे : दिनांक : ०८/१०/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी -भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे **मो. ९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे भोकर, ता.जि. धुळे येथिल गट नं.२०४/१/अ पैकी प्लॉट नं.७ ब चे क्षेत्र १४८.७८ चौ.मी. यांसी चर्तु: सिमा पुर्वेस : प्लॉट नं.८ अ, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ७ अ, उत्तरेस : गट नं.१९७. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.संदिप प्रभाकरराव बागल, रा. ८, नवनाथ देवपूर, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.द

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे / घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे : दिनांक : ०८/१०/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी -भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे **मो. ९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि.धुळे येथिल सर्व्हे नं. १७२/३ पैकी प्लॉट नं. १०४ चे क्षेत्र ७२ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ११८, दक्षिणेस : ३ मी. रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. १०३, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत रिद्धी गणेश नाथजोगी रा. २५, श्रीगुरु कॉलनी, वलवाडी शिवार धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे / घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे : दिनांक : ०८/१०/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी -भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे **मो. ९८२२८५२६५०**

# महाराष्ट्र शासन

**सा.बां. (उत्तर) विभाग धुळे**

**दरपत्रक सूचना क्र.३ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, धुळे दुरध्वनी क्र. (०२५६२) २८८७६३ हे राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मौजे वाडी ता.शिंदखेडा जि.धुळे येथील गावतलाव परिसरात किनारा सौंदर्यीकरण करणे येथील कामासाठी सोबत जोडलेल्या तक्त्यात भरुन महाराष्ट्र शासनाकडील सक्षम व पात्र एजन्सीकडुन सिलबंद लिफाफ्यात दरपत्रक मागवित आहेत. सदरचे दरपत्रके फक्त अंदाजपत्रक तयार करणे करीता मागविण्यात येत आहेत याची कृपया नोंद घ्यावी. सदरचे दरपत्रके कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, धुळे यांचे कार्यालयाकडे दि. १२/१०/२०२६ अगर तत्पुर्वी (शासकीय सुटीचे दिवस सोडुन) सादर करण्यात यावे. सिलबंद लिफाफे दि.१३/१०/२०२६ रोजी उघडण्यात येतील.

जा.क्र. भांडार/३८८४/२०२६
कार्यालय : कार्यकारी अभियंता,
सा.बां. (उत्तर) विभाग, धुळे
**Email:egsdhule.ee@mahapwd.gov.in**
दुरध्वनी क्र. (०२५६२)२८८७६३
दिनांक : २२/०९/२०२६

**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. (उत्तर) विभाग, धुळे**

## Quotation

Date: / /2026

To,
Executive Engineer
P.W. (North) Division,
Dhule

| Sr. No. | Description | Qty. | Rate per piece |
|---|---|---|---|
| 1. | MULTIPURPOSE PLAY SYSTEM<br>DIMENSIONS:<br>FRP Double Plain Slide<br>FRP Plain Slide<br>FRP Tunnel Slide<br>FRP Tunnel Bridge<br>Play Area: 8.0 M X 8.0M<br>Safe Area: 9.0 M X 5.5M<br>Product Height: 3.8M | 1 | |
| 2. | RABBIT DUST BIN (4 FEET)<br>DIMENSIONS:<br>Product height- 1.2 M<br>Diameter - Dia. 0.7 M | 1 | |
| 3 | 7 STRIP FRP GARDEN BENCH<br>**DIMENSIONS:**<br>Area - 0.6M X 15 M<br>Capacity:- 3 Adults<br>Product Height:- 0.75 M. | 1 | |
| 4 | TRIPLE FRP WAVE SLIDE<br>**DIMENSIONS:**<br>Age Group: 4 - 12 Year<br>Area :- 2.6 M X 5.5 M<br>Safe Play:- 4.5 M X 5.5<br>M Platform Height:- 1.5 M<br>Product Height:- 2.1 M | 1 | |
| 5 | MERRY GO ROUND<br>**DIMENSIONS:**<br>Age Group - 5 - 12 Year<br>Area :- 1.2 M<br>Safe Play Arca :- 2.5 M<br>Platform Height:- 0.25 M | 1 | |
| 6 | RAINBOW LADDER<br>DIMENSIONS:<br>AGE GROUP:-3-14 YRS<br>PLAY AREA -0.5M X 2.4 M<br>SAFE AREA-1.5 MX 3.8M<br>Product Height - 1.5 M | 1 | |
| 7 | TWO-SEATER PREMIUM SWING<br>DIMENSIONS:<br>Age Group:-4-14 Years.<br>Area: 1.25 MX 3.0M<br>Safe Play Area: 3.0 X 4.0 M<br>Product Height: - 2.6 M | 1 | |
| 8 | EPDM SYNTHETIC RUBBER FLOORING<br>Providing and fixing EPDM (ethylene propylene diene monomer) granules arc a type of synthetic rubber material that is widely us3d in the manufacturing of sports surfaces, playgrounds. and other applications that require high- performance and durable materials.<br>They are made of a polymer compound that offers excellent elasticity, flexibility, and resistance to abrasion, weathering, and chemicals. Physical Properties:<br>Property's Value/ Value Range/ Uo as directed by engineer in charge. | | |

| EPDM Flooring Thickness Chart | | |
|---|---|---|
| Flooring Thickness | EPDM Layer Thickness (Top Layer) | Rubber Crumb/ Buffing Layer Thickness (Base Layer) |
| 25 mm | 6 mm | 19 mm |

**Yours faithfully,**

जाहिरात क्र. जिमाका/धुळे/जाहि/१०५/२०२६-२७

**Executive Engineer**
**P.W.(North) Division, Dhule.**

पान १ वरुन

## आयुक्त ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी

त्यांनी केला. नरेंद्र मोदी, अमित शाह आणि ज्ञानेश कुमार यांनी मत चोरी करून देशातील लोकशाही संपवण्याचे काम केले आहे. या सर्वांना त्याची किंमत मोजावी लागेल, असा इशाराही राहुल गांधी यांनी दिला.

**इंडिया आघाडीच्या प्रमुख मागण्या**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी संसदेत प्रस्ताव आणावा. प्रक्रियेत मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे सार्वजनिक करावीत. मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी संबंधित मतदाराला नोटीस देऊन अपील करण्याची संधी द्यावी, अशा प्रमुख मागण्या इंडिया आघाडीच्या आहेत.

**मतपत्रिकेद्वारे निवडणुका घ्याव्यात**

दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी राजघाट आणि परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. लोकशाही वाचविण्यासाठी आता होणाऱ्या निवडणूका इव्हीएम मशिन ऐवजी मतपत्रिकेवर घेण्यात याव्यात, अशी मागणी विरोधकांची आहे. इंडिया आघाडीच्या आंदोलनाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## बंगळुरात सीजेपीचे आंदोलन मोदींवर टीका

म्हटले. भाजपकडून एक राष्ट्र, एक निवडणूक, अशी घोषणा केली जाते. मात्र, त्यांचे ध्येय एक राष्ट्र, एक पक्ष, निर्माण करण्याचे असल्याचा आरोप दीपके यांनी केला. त्यांनी भाषणात २०२४ मधील भाजप आणि काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारीतील फरकाचाही उल्लेख केला.

आयुक्तांवर गुन्हा दाखल करा

अभिनेते प्रकाश राज यांनीही आंदोलनाला संबोधित करत एसआयआर प्रक्रियेवर टीका केली. पूर्वी निवडणूक अधिकारी घरोघरी जाऊन नवीन मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करत होते. आता मात्र मतदारांना आपले नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये, यासाठी अधिकाऱ्यांकडे विनंती करण्याची वेळ आल्याचे ते म्हणाले. एसआयआर प्रक्रियेमुळे मतदान कोण करणार हे सरकार ठरवत असल्याचा आरोप प्रकाश राज यांनी केला. मतदार यादीतून नावे वगळण्यामागे विशिष्ट पद्धत असल्याचा दावा करत त्यांनी अल्पसंख्याक, आदिवासी आणि मुस्लिम मतदारांचा उल्लेख केला. केवळ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवणे हा आंदोलनाचा उद्देश नसून एसआयआर प्रक्रिया पूर्णपणे रद्द करावी आणि ज्ञानेश कुमार यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी प्रकाश राज यांनी केली. या मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला.

**दहा ऑक्टोबरला दिल्लीत आंदोलन**

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीकडून दहा ऑक्टोबर रोजी दिल्लीत जंतर-मंतर येथे आंदोलन करण्यात येणार आहे. यापूर्वी अभिजीत दीपके यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारवर निशाणा साधला होता. आंदोलनापूर्वी मोठ्या संख्येने लोकांना ताब्यात घेतले जात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. सत्तेचा वापर करून विरोधाचा आवाज दाबता येणार नाही, असा दावा करत दीपके यांनी आंदोलकांची संख्या वाढतच जाईल, असा इशारा दिला आहे. त्यामुळे दहा ऑक्टोबरच्या दिल्लीतील आंदोलनाकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## अकाली एक्झिटमुळे सर्वांच्या मनाला तीव्र चटका

आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदान लक्षात घेऊन, आम्ही त्यांच्यावर संपूर्ण शासकीय सन्मानाने अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला.

ऑन्कोलॉजिस्ट डॉ. शेखर साळकर यांनी नाना पाटेकर रुग्णालयात दाखल झाल्यावर त्यांच्यावर उपचार केले, मात्र, पीटीआयशी बोलताना डॉक्टरांनी सांगितले की, त्यांना रुग्णालयात मृत अवस्थेत आणण्यात आले होते आणि पस्तीस मिनिटे सतत सीपीआर व कार्डियाक मसाज करूनही त्यांना वाचवता आले नाही. नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये गमन चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. पुढे ते चित्रपटसृष्टीतील एक सर्वोत्कृष्ट आणि विश्वासार्ह नाव बनले. ते वर्षानुवर्षे चित्रपटांमध्ये सक्रियपणे सहभागी राहिले. वर्षानुवर्षे या दिग्गज अभिनेत्याने प्रेक्षकांचे मनोरंजन करणे सुरूच ठेवले. त्यांचा शेवटचा चित्रपट वेलकम मधील त्यांचे सह-अभिनेते अनिल कपूर यांच्यासोबतचा सुभेदार होता, ज्यात त्यांनी नाना वाघमारे यांच्या भूमिकेत एक विशेष कॅमिओ केला होता. नाना पाटेकर यांना २०१३ मध्ये प्रतिष्ठेचा पद्मश्री, तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, चार फिल्मफेअर पुरस्कार, दोन महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार आणि दोन फिल्मफेअर मराठी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

**निकटच्या मित्र गेला : फडणवीस**

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्रासह राजकीय क्षेत्र आणि संपूर्ण सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाना पाटेकर यांना आपला निकटचा मित्र संबोधत त्यांच्या अकाली निधनाचा मोठा धक्का बसल्याचे म्हटले आहे. नाना पाटेकर हे पडद्यावर जितके मोठे अभिनेते होते, तितकेच मनानेही मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी आपल्या अभिनयातून एक वेगळा कालखंड दिला. प्रामुख्याने राष्ट्रभक्त अशी त्यांची प्रतिमा प्रेक्षकांच्या मनात कायम राहिली, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलयुक्त शिवार अभियानातील त्यांच्या योगदानाची आठवण करून दिली. जलयुक्त शिवार अभियानाला पाठिंबा देण्यासाठी नाना पाटेकर स्वतः पुढे आले होते. अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासोबत त्यांनी नाम फाऊंडेशनची स्थापना करून शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी प्रत्यक्ष काम केल्याचे सांगितले. त्यांची अचानक झालेली एक्झिट मनाला चटका लावणारी असल्याचे फडणवीस यांनी म्हटले.

## काँग्रेस पक्षाच्या ठिय्या आंदोलनाची तातडीने दखल

काँग्रेस पक्षाच्या वतीने अमीन अ. करीम पटेल यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाकडे निवेदन देऊन सीटी स्कॅन सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच सीटी स्कॅन सेवा बंद राहण्याची कारणे निश्चित करून आवश्यक ती कार्यवाही करावी, संबंधित कंपनीची देयके प्रलंबित असल्यास ती निकाली काढावीत आणि रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती.

या निवेदनाची दखल घेत जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून सीटी स्कॅन मशीन/सेवा पुन्हा सुरू केली आहे. त्यामुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य व गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणाऱ्या जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या प्रशासनाचे काँग्रेस पक्षाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. तसेच या प्रश्नासाठी निवेदन देऊन पाठपुरावा करणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, विविध समाजबांधव व नागरिकांचे काँग्रेस पक्षाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

सर्वसामान्य रुग्णांना वेळेवर व आवश्यक वैद्यकीय तपासणी उपलब्ध होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब असून, सीटी स्कॅन सेवा सुरू झाल्याने रुग्णांची गैरसोय दूर झाली आहे, असे काँग्रेस पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

## शहाद्यात आज किसान दिन पुरुषोत्तम पुरस्कार सोहळा

नामदार जयराम गावित यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी व्यक्ति स्तरावरील मानाचा पुरुषोत्तम पुरस्कार कापूस तज्ञ पद्मश्री डॉ. श्रीरंग देवबा लाड (दादा लाड), माळसोन्ना, जिल्हा परभणी यांना, तर संस्था स्तरावरील पुरस्कार सोल्जर इंडिपेंडेंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन, पुणे यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे.शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडेल. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पानसेमल (मध्य प्रदेश) येथील आमदार श्याम बर्डे, ओंकार साखर कारखाना व अशोक नागरी सहकारी बँक (पिंपरी, पुणे) चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी आणि पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव जयश्रीताई दीपक पाटील उपस्थित राहणार आहेत.या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. पी. के. अण्णा फाउंडेशनचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील व पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष जगदीशभाई पाटील यांनी केले आहे अशी माहिती मंडळाचे समन्वयक प्रा.मकरंद पाटील यांनी दिली आहे.

पान १ वरुन

## दोंडाईचात जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील

कार्यक्रमाच्यासमारोप प्रसंगी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई चे मुख्य कार्यकारी अधिकारी वीरसेन गुरव यांनी जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध सहकारी बँकांचे प्रतिनिधी होते. चोपडा पीपल्स को-ऑपरेटिव बँकेचे चेअरमन चंद्रहासभाई गुजराती, दादासाहेब रामराव पाटील को-ऑपरेटिव बँक लि. साक्री चे व्हॉ. चेअरमन डी. एल. तोरवणे, संचालक याकूब पठाण, सतीश देसले, केतन शहा, सुबोध भामरे , दि शिरपूर पीपल्स को-ऑपरेटिव बँक लि. चे चेअरमन योगेश भंडारी, धुळे विकास सहकारी बँक लि. चे संचालक रमेश पाटील,भगवान केलेवार,साहेबराव माळी, दि नंदुरबार मर्चंट को ऑफ बँक लि. नंदुरबार चे चेअरमन किशोरभाई वाणी व संचालक बळवंत जाधव, के.टी.पाटील, प्रमोद पाटील, दि अर्बन पीपल को-ऑप बँक लि. धरणगाव चे चेअरमन प्रवीण कुडे, संचालक अंजनीकुमार मुंदडा, ज्ञानेश्वर भामरे, नवापूर मर्चंट को-ऑप बँक लि. नवापूर चे चेअरमन निलेश वसावे व संचालक अभिजीत पाडवी, धुळे नंदुरबार गव्हर्मेंट बँक चे चेअरमन राजेंद्र देसले, इंदिरा महिला सहकारी बँक लि. नंदुरबार चे संचालक जिग्नेश देसाई, बाळकृष्ण वाणी, प्रशांत पवार, इब्राहिम पटेल, गोवर्धनजी रघुनाथसिंग को बँक लि. नवापूर संचालक अंकलेश शहा, भरत पटेल, राहुल पाटील, अमित देवरे, मोती अर्बन को ऑफ बँक लि. तळोदा चे चेअरमन निखिल तुर्खियाँ, श्री महावीर सहकारी बँक लि. जळगाव चे संचालक शांतीलाल विनायका, सागर पगारिया,रवींद्र पवार, अजय राखेचा, राहुल घोरपडे, द मॉडर्न को-ऑप बँक लि. चाळीसगाव चे चेअरमन अशोक खलाणे, दि जळगाव जिल्हा सेंट्रल को-ऑप बँक लि. जळगाव चे संचालक देविदास पाटील, तसेच हस्ती बँकेचे संचालक विजय पाटील, पांडुरंग कांगणे, वासुदेव पाटील, मंजुषा पाटील, अंकित वाघेला तसेच अधिकारी कर्मचारी यांनी सभेला उपस्थित राहून दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हस्ती बँकेचे सीईओ सतीश जैन यांनी केले.

## गुंडगिरी व महिलांच्या संरक्षणासाठी

निवेदनात धुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी व गुंडगिरी संपविण्यासाठी पोलिसांनी प्रभावी मोहीम राबवावी, गोपनीय लेखी अथवा तोंडी माहिती मिळाल्यानंतर गुन्ह्यांची तातडीने चौकशी करावी, तसेच महिला व मुलींची छेड काढणाऱ्या व त्यांना त्रास देणाऱ्या गुंडांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी तत्काळ गुन्हे दाखल करून कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली. धुळे शहरासह तालुक्याच्या ठिकाणी आणि मोकळ्या भूखंड, रस्ते तसेच महामार्गालगतच्या परिसरात सायंकाळी वाजेनंतर मद्यपान करणाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच अशा ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. रात्रीच्या वेळी एकट्या व्यक्तीला मोटारसायकल अथवा पायी जाण्यास भीती वाटणाऱ्या ठिकाणी सायंकाळी वाजेपासून गस्ती पथके फिरविण्याचे आदेश द्यावेत, अशी सूचनाही समितीने केली आहे. यावेळी संविधान संरक्षण समितीचे जेष्ठ निमंत्रित सदस्य श्री. हरिश्चंद्र लोंढे, प्रा. बाबा हातेकर, गो. पी. लांडगे, पंडित गोसावी, पी.टी. बेडसे, मनोहर मोहिते, कॉम्रेड एल. आर. राव, पोपटराव चौधरी, राजेंद्र अहिरे, श्रीकृष्ण बेडसे, रामकृष्ण शिंदे, बबनराव वानखेडे, दीपक सोनवणे, मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर, किशोर शेजवळ, नवल ठाकरे, मोहंमद जैद, आसिफ शेख, सादिक शेख यांच्यासह संविधान संरक्षण समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोन दुचाकींमध्ये धडकएक ठार, दोन जखमी

आज सकाळी साडेअकराच्या सुमारास मोटार सायकलने धुळे शहराकडे येत होते. लोंढे नालाजवळ समोरून येणाऱ्या दुसऱ्या मोटरसायकलची धडक झाली. त्यात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने छोटू पावरा यांचा मृत्यू झाला. तर अन्य मोटर सायकल स्वार दायसिंग चंद्रा गायकवाड, भिवा नाईक (रा. लोंढे नाला) जखमी झाले. छोटू पावरा मूळचे चंदवाडा (ता. धडगाव) रहिवासी असुन त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, पत्नी, दोन मुलगे असा परिवार आहे. दरम्यान, गतिरोधक नसल्याने अपघात होत असल्याची ग्रामस्थांनी रास्ता रोको करीत तक्रार केली. दोघा जखमींना तात्काळ जिल्हा रुग्णालयात हलविले.

## वंचित बहुजन युवा आघाडी आक्रमक

पूर्वीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर वीजबिले येत असल्याच्या तक्रारी आहेत. काही ग्राहकांना अवाजवी तसेच अंदाजित वीजबिले देण्यात येत असल्याने सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार, लघु व्यावसायिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर आर्थिक भार पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नियमांचे पालन न करता बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरची तात्काळ सखोल चौकशी करावी. चौकशीत नियमबाह्य पद्धतीने मीटर बसविल्याचे आढळल्यास ते तात्काळ काढून संबंधित ग्राहकांचे पूर्वीचे वीज मीटर पुन्हा बसवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच स्मार्ट मीटर बसविल्यानंतर आलेल्या वाढीव वीजबिलांची स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय चौकशी करून चुकीची अथवा अवाजवी बिले दुरुस्त करावीत, अशीही मागणी करण्यात आली. या निवेदनातील मागण्यांवर २० दिवसांच्या आत योग्य व समाधानकारक कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने मोठ्या प्रमाणावर आंदोलन, मोर्चा व इतर संविधानिक आंदोलनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. निवेदनावर वंचित बहुजन युवा आघाडीचे नवापूर तालुका युवा अध्यक्ष उमेश बापू पवार, वसंत पेंढारकर, गोरख नगराळे, मनीष जाधव, रविद मोरे, महेंद्र सैंदाणे, आकाश चव्हाण, योगेश खैरणार आणि अजय चव्हाण यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्यांवर

उत्तम बुधा कराडे, लहानू आमु डोमाळे, रमेश बाबुलाल मारनर, गजमल बाबुलाल मारनर, दत्तू गंगाराम मारनर, नागू किसन मारनर, नाना नामदेव डोमाळे, पोपट कालू मारनर व नाना अमृत मारनर यांनी ४३ हजार रुपयांची वीजचोरी केली. देवनगर (ता. साक्री) गावात १२ हजार ९०००रुपये किमतीची वीजचोरी केल्याने सोमा लहानू बाचकर, भगवान लहानू मारनर व सुभाष तापीराम कराडे यांच्याविरोधात कारवाई केली आहे.

## नंदुरबारच्या चोऱ्या व गुन्हेगारीला आळा घाला; राज्य कर्मचारी महासंघाची मागणी

**नंदुरबार, दि.८(प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून चोरी, जबरी चोरी, घरफोड्या, महिलांच्या मंगळसूत्रांची चोरी, सोन साखळी चोरी, मंदिरातील चोऱ्या, दुचाकी व चारचाकी वाहनांची चोरी, वन्यजीव प्राण्यांची तस्करी, तसेच विविध प्रकारचे रॅकेट यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक नसल्यामुळे राज्य शासनाने लक्ष देण्याची मागणी मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष रणजितसिंग राजपूत यांनी केली आहे.**

यासंदर्भात रणजीतसिंग राजपूत यांनी राज्याचे मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक मुंबई, पालकमंत्री, पोलीस महानिरीक्षक नाशिक, जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात राजपूत त्यांनी म्हटले आहे की, रात्रीच्या वेळी गस्त देण्यात येत असली तरी चोरट्यांना पोलिसांचा धाक राहिलेला नसल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील शहर तसेच उपनगर भागातील वाढीव वस्त्यां मध्ये रहिवाशांच्या दररोज मालमत्तेच्या गुन्ह्यांच्या घटना घडत आहेत. दिवसेंदिवस मालमत्तेच्या गुन्ह्यांत वाढ होत असून पोलिस प्रशासना समोर हे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.नंदुरबार व उपनगर भागात घडलेल्या दंगली तसेच संघटित गुन्हेगारीचे प्रमाणही वाढले आहे. त्याला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन कमी पडत आहे की काय असा प्रश्न ?सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे. या क्षेत्रात रोज नवनवीन टोळ्या व गुन्हेगारीची व्याप्ती वाढत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. पोलिस चौक्यांची गरज जिल्ह्यात पोलिस चौक्या नामशेष होण्याच्या मार्गावर असून काही ठिकाणी अतिक्रमणात हरवल्या आहेत. चौक्यांवर पोलिस कर्मचारी नसल्यामुळे अफवा पसरल्याने पूर्वी दंगली झाल्या आहेत. जिल्ह्यातील १५ पोलिस चौक्यां पैकी ६ चौक्या नंदुरबार शहरात असून हाटदरवाजा, मंगळ बाजार, जळका बाजार, पतरा चौकी व फडके चौकी यांचा त्यामध्ये समावेश आहे. जिल्ह्याच्या बहुतांश ठिकाणी पोलिस चौक्या होणे क्रमप्राप्त आहे. मागील दोन ते तीन वर्षांचा इतिहास पाहता मोठ्या प्रमाणावर दोन समाजात जातीय दंगली झाल्या आहेत. त्याठिकाणी पोलिस चौक्यांच्या २०० मीटर अंतरावर विविध घटना घडल्यामुळे वेळोवेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.पाच वर्षांपासून पोलिस कर्मचारी नसल्याने बंद अवस्थेत असलेल्या पोलिस चौक्यांमध्ये कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावेत. तसेच दोन राज्यांच्या सीमावर्ती भागात, आऊट पोस्ट भागात व उपनगर भागात नव्याने पोलिस चौक्या निर्माण करण्याची काळाची गरज आहे. याबाबत शासन स्तरावर उपाययोजना करावी, अशी विनंती महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे उपाध्यक्ष रणजितसिंग राजपूत यांनी केली आहे.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

## पिंपळनेर (प्रा) वनक्षेत्रतर्फे वन्यजीव सप्ताह; रथाव्दारे गावागावामध्ये प्रसिध्दी




**पिंपळनेर,दि.८(प्रतिनिधी)- पिंपळनेर (प्रा) वनक्षेत्राने वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून वाढत्या मानव वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रसिध्दी रथाव्दारे वनकर्मचाऱ्यांकडुन गावागावामध्ये प्रसिध्दी अभियान राबविण्यात येत असून यास नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष कमी होऊन मानव-वन्यजीव सहजीवन साध्य होण्यास मदत मिळणार आहे. याबरोबर वनक्षेत्रात श्रमदानातून वनराई बंधारा बांधून वन्यप्राण्यासाठी पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. बल्हाणे,मोहगांव, चरणमाळ, वंजारकुडी या गावातील शाळांमध्ये वनकर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना जैवविविधता, वन्यप्राण्याचे महत्व पटवुन दिले. तसेच विद्यार्थ्यांची निबंध,चित्रकला स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.**

सदर उपक्रम श्रीमती निनू सोमराज, वनसंरक्षक धुळे,मो.बा. नाईकवाडी, उपवनसंरक्षक धुळे,राजेंद्र सदगीर,विभागीय दक्षता अधिकारी धुळे,योगेश सातपुते,सहायक वनसंरक्षक धुळे यांच्या मार्गदर्शनाखाल ओंकार शं. ढोले,वनपरिक्षेत्र अधिकारी पिंपळनेर (प्रा) यांचे नेतृत्वात पार पडला. या उपक्रमात वनपाल आर. एस. मोरे,डी.एन. सोनवणे, आर.व्ही. चौरे,डी.बी.महाले, वनरक्षक जी.एस. बारीस,डी. बी.देसाई,पी. जी.जेलेवाड, ए.एम.घरटे, श्रीमती.एस.ई. ठाकरे,व्ही.एस. माळी,आय.बी. पावरा, श्रीमती.एस.सी. पावरा,श्रीमती एम. एम. वळवी,डी.एल. राठोड,एस. पी. पावरा,ए.बी. पदमोर,ए.बी. पावरा, श्रीमती टी.के. चौरे,श्रीमती जे. आर.भोई,आर.बी. माळचे,राकेश पावरा,वनमजुर बाजीराव पवार, मधुकर कुवर या वनकर्मचारी यांचेसह शाळकरी विद्यार्थी,शिक्षक, ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

पान १ वरुन

## सागवान लाकूड तस्करीचा डाव उधळला

सी ६६३६ संशयास्पदरीत्या येताना दिसून आले. वनविभागाच्या शासकीय वाहनाची व कर्मचाऱ्यांची चाहूल लागताच वाहन चालक व त्याचे साथीदार वाहन रस्त्यातच सोडून अंधाराचा फायदा घेत जंगलात पसार झाले. वन कर्मचाऱ्यांनी त्यांचा शोध घेतला, मात्र ते मिळून आले नाहीत. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये सागाच्या ११४ चौकटी, एकूण १३.६४५ घनमीटर, अंदाजे ३७,६९४ रुपये किमतीचा लाकूडसाठा आढळून आला. तसेच २ लाख ७५ हजार रुपये किमतीचे बोलेरो पिकअप वाहन, असा एकूण ३ लाख १२ हजार ६९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त वाहन व लाकूडसाठा धडगाव टिंबर डेपो येथे ताबा पावतीने जमा करण्यात आला. या प्रकरणी वनरक्षक, सावऱ्या यांनी वन गुन्हा क्र. ०८/२०२६, दि. ०८/१०/२०२६ अन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील कलम २६(१)(अ), २६(१ए), ४१(१), ४२ व ५२(१) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास वनपाल भरतसिंग परदेशी करीत आहेत.

सदरची कारवाई वनसंरक्षक, वनवृत्त धुळे श्रीमती निनु सोमराज, उपवनसंरक्षक नंदुरबार संतोष सस्ते, विभागीय दक्षता अधिकारी, वनवृत्त धुळे राजेंद्र सदगिर आणि सहाय्यक वनसंरक्षक रोशन बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

तसेच वनक्षेत्रपाल बिलगाव (प्रा.) लक्ष्मीकांत शेंडगे आणि वनक्षेत्रपाल अक्राणी रोहन पाटील यांच्या नेतृत्वाखाली वनपाल भरतसिंग परदेशी, वनपाल सिद्धार्थ बैसाणे, वनरक्षक पवन पाडवी, उमेश पावरा, अरविंद निकम, दिलवरसिंग पावरा, अमरसिंग पावरा, दिनेश वसावे तसेच वाहनचालक हेमंत पावरा यांनी ही कारवाई केली. वनविभागाच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील वनतस्करांमध्ये खळबळ उडाली असून, वनसंपत्तीच्या अवैध वाहतुकीविरोधात वनविभागाने कारवाई अधिक तीव्र केली आहे.

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



शंकर विजय सॉ मिल

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे

फो. 9595397718, 9665886722

**विकणे आहे**

पंचवटी टॉवर मधील २ ऱ्या माळ्यावरील हॉल साधारण २००० चौ. फुट व ५०० चौ. फुट बसमेंट हॉल, ४०० चौ. फुट

देवपूर धुळे

बँक ऑफ महाराष्ट्र समोर,

-: संपर्क :-

9823028632

## धुळ्यात अतिक्रमण निर्मुलन

धुळे दि.८- शहरातील पाटबाजार परिसरात महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकाने मोहिम राबवली. त्यात पाटबाजार सुमारे चाळीस वर्षांपेक्षा अधीक काळापासून असलेली व्यावसायिक अतिक्रमणे काढण्यात आली. ही अतिक्रमणे काढल्यामुळे या भागातून वाहणारा पाट अनेकांना पहिल्यांदाच नजरेस आला. व्यावसायिकांनी या ठिकाणी अतिक्रमण केले तर फौजदारी स्वरूपाची कारवाई होईल, असा समज देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

**पाहिजेत**

धुळे एस टी स्टँडवरील पे अँड पार्किंग साठी मशीन ऑपरेटर, व दुचाकी वाहने लावण्यासाठी ८ तास ड्युटी साठी होतकरू कर्मचारी त्वरीत पाहिजेत.

आकर्षक पगार

-: संपर्क :-

9765229022




59 वर्षापासून आपल्या सेवेत...

District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

**पाहिजेत**

नवी क्रेटा गाडीसाठी कायमस्वरुपी व अनुभवी चालकाची आवश्यकता आहे.

आकर्षक पगार

-: संपर्क :-

9822408140

**पाहिजे**

रेडिमेड कापड दुकानासाठी अनुभवी सेल्समेन /सेल्सगर्ल आणि हेल्पर पाहिजे.

सोनपरी

नवग्रही ग. नं. २ धुळे

236252

**फ्लॅट भाड्याने देणे आहे**

जयहिंद कॉलनी 2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. सरकारी कर्मचाऱ्यास प्राधान्य

-: समक्ष भेटा :-

7796509258

**पाहिजेत**

होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत

१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी

२) दुकान काम हेल्पर

अनुभव असल्यास प्राधान्य

-:संपर्क :-

8888096777

**पाहिजे**

मेडिकल-होलसेलमध्ये कामासाठी मुले/मुली/ महिला पाहिजेत

१) कॅम्प्यूटर आपरेटर/ अकौन्टंट

२) सेल्समन बाहेर गावासाठी/ सेल्समन गावासाठी

३) मदतनीस/हेल्पर

-: संपर्क :-

संजय मेडिकल्स्

गल्ली नं.२ धुळे

**पाहिजेत**

अनुभवी सेल्समन पाहिजे.

आकर्षक पगार

-: संपर्क :-

साईबाबा रेडिमेड & होजीअरी

गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे

9422286958

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०